



## गोष्ट क्र. ३४

खरंतर प्रबोधिनीतलं काय बदलाव असं वाटतय, या प्रश्नाचं माझं उत्तर 'काही नाही' असंच असेल. मात्र अगदीच सांगायचं झालं तर प्रबोधिनीचा हिंदुत्ववादी असा जो चेहरा झालेला आहे तो कसा बदलता येईल असा विचार झाला पाहिजे. शाळेत असताना आम्ही सगळ्या धर्मांचा अभ्यास करायचो, सगळ्या धर्मांच्या प्रार्थना म्हणायचो. मला कधी हा हिंदुत्ववादी चेहरा जाणवला नाही. मी जेव्हा साथी संस्थेत मुलाखत दिली तेव्हा त्यांना मी प्रबोधिनीची आहे या वरून मी उजव्या विचारसरणीची असेन असे वाटले होते. तुम्ही कुठल्या विचारसरणीचे आहात ही गोष्ट तुमच्या कामापुढे दुय्यम असते, म्हणून मी सगळया विचारसरणीच्या लोकांबरोबर काम करू शकते. मला फक्त स्त्रीविकासासाठी काम करायचं आहे एवढंच लक्षात घ्या. हे पाहिल्यावर मला त्यांनी काम करायची संधी दिली.

नीलांगी नानल–सरदेशपांडे
(१९८३–१९८९)

**उत्तरप्रदेशातून पुण्यात प्रबोधिनीत**



मी जेव्हा प्रबोधिनीत आले त्याच्या आधी मी UP आत्ताचे उत्तरांचल येथे हिंदी माध्यमात शिकले होते. माझ्या वडिलांची एका सर्व दृष्टीने मागे असलेल्या खेड्यात बदली झाली जिथे शिक्षणाची सोय नव्हती त्यामुळे शिक्षणासाठी मी पुण्यात आले. हिंदी माध्यमातून शिकता येईल या दृष्टीने मला प्रबोधिनीत घालण्याचा आईबाबांनी निर्णय घेतला. मला प्रबोधिनीचं glamour फार माहीतच नव्हतं. मी उत्तर काशीच्या एका थंड वातावरणाच्या छोट्याशा प्रदेशातून, पुण्याच्या गर्दीत, रहदारीत आले होते. या शहरी वातावरणाशी जुळवून घेणे ही माझ्यासाठी खूप नवीन गोष्ट होती. शाळेत असताना काही-काही उपक्रमांचं महत्त्व कळायचं नाही. इतर शाळांच्या मानाने आपल्याला खूप कमी सुट्ट्या असतात हे कधी-कधी जाचक वाटायचे. दलाची सक्ती वाटायची पण पुढे-पुढे त्याचं महत्त्व उमगत गेलं. तेव्हा कधी त्या रंगात रंगून गेले कळलंच नाही.



शाळेतील त्रिकूट

८वीत असताना मी आणि माझी मैत्रिण प्रीती जोशी, आम्ही साबण बनवायचा प्रकल्प केला होता. त्यासाठी आम्ही दोघी धडपडत चाकण ऑइल मिल्स मधली साबण बनवण्याची प्रक्रिया बघायला गेलो होतो. अशा छोट्या-छोट्या प्रकल्पांतून आम्ही खूप शिकत गेलो. आम्ही १०वीत असताना बिहारला भूकंप झाला होता. बोर्डाचं वर्ष असूनही आम्ही मदतकार्यासाठी गेलो होतो. तिथे गेल्यावर आपण किती सुरक्षित वातावरणात पुण्यात राहतो हे प्रकर्षाने जाणवले. तिथे आजही महिलांचे सुरक्षेचे प्रश्न दिसत असताना जवळपास ३० वर्षांपूर्वी आम्ही तिथे गेलो होतो. तो एक खूप सुंदर अनुभव आमच्या दृष्टीने होता.





**१९८८ मधील बिहार दौरा**

माझ्यासाठी तो पहिला eye opener होता. मी ज्या NGO मध्ये काम करायचे तिथे SWOT analysis करायचो. आणि त्यात मला multitasking जमते असे कुणीतरी लिहिले होते. तेव्हा माझ्या लक्षात आलं की अरे हे तर आपण प्रबोधिनीतच शिकलो. कमीत कमी वेळात जास्तीत जास्त उपयोगी काम करण्याचं कौशल्य हे प्रबोधिनीतच मिळालं होतं. शाळेत खूप वेगवेगळी बीजं पेरली जातात. त्याच्यातून योग्य वेळेस योग्य अंकुर फुटतात. माणूस घडण्याची प्रक्रिया तिथे सुरू होते.

माझी मुलगी उर्वीसुद्धा प्रशालेतच शिकायला होती. जेव्हा तिला प्रवेश मिळाला तेव्हा आपल्याला जे-जे काही मिळालं ते सगळं तिला मिळणार आहे या कल्पनेनेच मला खूप भारावून जायला झालं होतं. आता तिच्यावर उत्तम संस्कार होणार याची खात्री होती. तिच्या वर्गातल्या मुलींच्या पालकांना जेव्हा-जेव्हा काही प्रश्न यायचे जसे की शाळा अभ्यासाकडे लक्षच देत नाही तेव्हा मी त्यांना निर्धास्त मनाने सांगायचे, की प्रबोधिनीतील प्रत्येक ॲक्टिव्हिटी ही खूप विचारपूर्वक प्लॅन केलेली असते त्यामुळे तुम्ही काळजी करू नका. तिच्याबरोबर पुन्हा एकदा शाळा अनुभवताना प्रबोधिनीने खूप काळानुरूप बदल केलेले आहेत असं जाणवलं. प्रशालेने आम्हाला मिळालेले ते सर्व संस्कार सांभाळले आहेत आणि अर्थात वाढवले आहेत हे निश्चितपणे प्रशालेचं यश आहे.

### आयुर्वेद शाखेत शिक्षण

मी खूप सरधोपटपणे माझा मार्ग निवडला. तेव्हाच्या प्रथेप्रमाणे मी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. जीवशास्त्र आवडायचं आणि त्यामुळे वैद्यकीय सेवेत जायचं ठरवलं होतं. MBBS चा प्रवेश काही मार्कांनी हुकला होता म्हणून मग आयुर्वेद शाखेला प्रवेश घेतला. आयुर्वेदाचा तो अभ्यासक्रम मला खूप आवडला. प्रबोधिनीत संस्कृत खूप उत्तम शिकलो होतो, त्यामुळे तिथे श्लोक पाठ करणं हे फार अवघड गेलं नाही. आपण प्रबोधिनीत ज्या उपासना करतो, त्यातले बरेच शब्द माहीत होते, त्यामुळे पंचमहाभूत, चित्त अशा संकल्पना अवघड वाटल्या नाहीत. मला स्त्रीरोग या विषयात पुढे पदव्युत्तर शिक्षण घ्यायचं होतं, त्यासाठी मी एका रुग्णालयात काम करायला सुरुवात केली. मात्र तिथे काम करत असताना मला असं वाटायला लागलं की आपण संशोधन करायला हवं. दवाखाना उघडायचा आणि रुग्ण तपासायचे हे काम फार भावलं नाही. पण आता संशोधन करायचं तर त्याकरिता पुढे शिक्षण घेणं जरुरीचं होतं. मात्र नक्की कुठल्या शाखेतलं पदव्युत्तर शिक्षण घ्यायचं हा एक मोठा प्रश्न होता. मी पुणे विद्यापीठामध्ये प्रत्येक विभागात जाऊन तिथला अभ्यासक्रम बघितला आणि तिथेच मला Health Science शाखेविषयी समजलं व Public Health या विषयत मी एम.एस. केलं. डॉक्टरकीचं शिक्षण घेऊन प्रॅक्टीस करायची नाही हा निर्णय पचवणं थोडं अवघड होतं. पण संशोधनाविषयीच्या कुतुहलापोटी तो मार्ग निवडायचं निश्चित केलं.

### किशोरी व महिलांच्या आरोग्याचा प्रश्न

माझी पहिली internship मी BAIF या संस्थेबरोबर केली होती. आम्ही पहिल्यांदाच गुजराथ मधील भरूच या छोट्या गावात गेलो होतो. तिथल्या किशोरवयीन मुलींचे प्रजनन आरोग्या विषयीचे प्रश्न समजून घेणं अशा स्वरूपाचं ते काम होतं. तेव्हा खूप नव्याने शिकायला मिळालं. NGOs कसं काम करतात हे उमजू लागलं. खरंतर प्रबोधिनी हीसुद्धा एक NGO च आहे, पण विद्यार्थी असताना हे रूप फारसं पहायला मिळायचं नाही. तिथून माझा प्रवास सुरू झाला. 'सेहत' या स्वयंसेवी संस्थेमध्ये मला नोकरी मिळाली, आणि गेले २० वर्षं मी या क्षेत्रात रमले आहे.




**खेडेगावामधील सत्कार**

आज या संस्थेचं नाव 'साथी सेहत' असं आहे. सेहत या संस्थेची सुरुवात २० लोकांपासून झाली. आज मुंबई आणि पुणे या दोन्ही ठिकाणी आमच्या संस्थेचं केंद्र आहे. या संस्थेचा तेव्हा एक ग्रामीण भागातील आरोग्य सेवांच्या प्रश्नांबद्दल प्रकल्प सुरू होता त्यासाठी त्यांना एका वैद्यकीय पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीची गरज होती, आणि इथून मी काम करायला सुरुवात केली. ग्रामीण भागातील महिला निवडून त्यांना प्राथमिक आरोग्य सेवा देण्याचे प्रशिक्षण द्यायचं असं या कामाचं स्वरूप होतं. या महिला 'आरोग्य-साथी' म्हणून काम करत असत. एखादा आजार झाला तर गावपातळीवर त्याचं निदान करणारी आणि जरूर पडेल तेव्हा दवाखान्यात जायचा सल्ला देणारी व्यक्ती गावात असावी असा आमचा प्रयत्न होता. मध्यप्रदेशातील बडवानी, ठाण्याजवळचे डहाणू आणि कोल्हापूर जवळील आजरा या ठिकाणी आम्ही हे काम करायला सुरुवात केली होती. २० वर्षांपूर्वी त्या भागात शिकलेल्या महिला मिळणं अवघड होतं. तिकडच्या महिला कधी शाळेतच गेल्या नव्हत्या. म्हणून त्यांच्या प्रशिक्षणाकरिता साथी संस्थेने चित्ररूप अशी पुस्तकं बनवली होती, पुढे जाऊन या प्रशिक्षणाला SNDT विद्यापीठाची मान्यता मिळवून दिली. आज याच्यासारखाच ASHA नावाचा प्रकल्प सरकारकडून चालवला जातो.

Health Equity या विषयावरचं आमचं काम Global Equity Guage Alliance च्या ग्रीस येथील इंटरनॅशनल कॉन्फरन्समध्ये मांडले गेले. आरोग्य विषमता हा कायम माझ्या संशोधनाचा महत्त्वाचा विषय आहे. समानता आणि समता हे दोन शब्द आपण नेहमी एकमेकांऐवजी वापरतो. समानता म्हणजे समान वाटप करणं आणि समता म्हणजे गरजेप्रमाणे वाटप करणं. आम्ही महाराष्ट्रात दहा जिल्ह्यांत जवळपास १६०० कुटुंबांच्या आरोग्य विषयीचे एक संशोधन केले होते. उसतोड कामगारांच्या आरोग्याच्या प्रश्नांबद्दल अभ्यास केला होता. साथी संस्था मुख्यत्वे आरोग्य हक्कांसाठी काम करते. लोकांना आरोग्य सेवा मिळवण्यासाठी जे कष्ट पडतात या विषयात मी संशोधन करत होते. Denial of Health visits या विषयीच्या केसेसचं documentation करून आम्ही National Human Rights Commission (NHRC) समोर हा अहवाल सादर केला होता. सरकार आरोग्यावर किती आणि कसा खर्च करतं याचा अभ्यास केला होता. त्याकरिता International Budget Partnership या संस्थेतर्फे पंधरा



**मलेशिया येथील आंतरराष्ट्रीय परिषद**







**आंतरराष्ट्रीय परिषदांमधील सहभाग**

दिवसांचं Expenditure Tracking या विषयाचं प्रशिक्षण घेण्याची संधी मला मिळाली. सरकारी आरोग्य व्यवस्थेमध्ये औषधं कशी विकत घेतली जातात आणि कशी पोचतात, आणि लोकांना मिळत का नाहीत यामागची कारणं शोधून काढायचा प्रयत्न केला होता. Evidence based advocacy हे आमच्या कामाचं मुख्य तत्त्व आहे. त्यामुळे त्याला पूरक असं संशोधन आम्ही करतो.

**आरोग्य शास्त्रात संशोधन**

स्त्रियांचे आरोग्य हा माझा अगदी आवडीचा विषय आहे. माझा पहिला प्रकल्प चालू असताना असं निदर्शनास आलं होतं की साताऱ्यातल्या एका गावात लोकसंख्येच्या मानाने पुष्कळ स्त्रियांनी स्वतःचे गर्भाशय काढून घेतलेले आहे. पुढे विविध राज्यातून अशा Hysterectomies ची माहिती उजेडात येत गेली. आंध्रप्रदेश सरकारची एक आरोग्य विमा योजना होती आणि त्या योजनेच्या अंतर्गत ज्या महिला रुग्णालयात गेल्या त्यांचं गर्भाशय काढून टाकण्यात आलं अशी धक्कादायक माहिती पुढे आली होती. आणि हे काहीतरी चुकीचं घडतंय असं वाटत होतं. हे का घडतंय याचा अभ्यास करायला हवा होता. आणि मग या विषयात आपण Ph.D. करावी असं मला वाटत गेलं. बायका डॉक्टर पर्यंत का पोचत नाहीत? त्यांच्या अडचणी काय आहेत असा अभ्यास १९९०च्या दशकात झालेला होता. या महिला मात्र Hysterectomy करायला कशा तयार होतात या विषयीचं जास्त संशोधन झालेलं नव्हतं. आमच्या संशोधनात २५ वर्षांच्या महिलांची देखील Hysterectomy झालेली आढळली होती. १८व्या वर्षी लग्न, २०व्या वर्षी पहिलं मूल, २२व्या वर्षी आणखी एक मूल आणि त्यानंतर जर काही तक्रारी सुरू झाल्या तर गर्भाशय काढून घेणं हे चक्र त्या महिलांमध्ये दिसत होते. म्हणून मी ग्रामीण भागात जाऊन अभ्यास सुरू केला. हा प्रश्न समाजशास्त्राच्या अंगाने अभ्यास करायला लागणारा होता. Tata Institute of Social Sciences मधून पीएच.डी. केल्यामुळे वैद्यकीय दृष्टीकोनाच्या पलीकडे जाऊन स्त्रीवादी दृष्टीकोनातून मी या विषयात संशोधन केलं. त्यातून बऱ्याच गोष्टी पुढे आल्या.




**पीएच.डी. पदवीदान समारंभ, मार्गदर्शिका लक्ष्मी लिंगम यांच्याबरोबर**

आपल्याकडे मासिक पाळी बद्दलचा जो stigma आहे तो कुठेतरी याला कारणीभूत आहे. या गोष्टीकडे बघतानाच, बायका एकमेकांना सांगताना अगं माझी अडचण आहे असं संबोधतात, त्याला माझा problem चालू आहे असं म्हणतात. म्हणजे एखाद्या गोष्टीकडे आपण कायम कटकट म्हणून पाहतो. मुलीची पाळी सुरू झाली की आई कधीच तिला सकारात्मक उत्तरं देत नाही, आणि या सगळ्या गोष्टींमुळे याही बद्दल एक नकारात्मक मनोधारणा तयार होते. त्याच बरोबर ग्रामीण भागात पाणी, sanitary napkins उपलब्ध नसतात. त्यात जर वारंवार रक्तस्राव व्हायला लागला तर त्यांना त्यांचं शेतातलं काम करणं अवघड होऊन बसतं आणि या सगळ्या गोष्टी बघता जर एखादी



स्त्री, मला दोन मुलं आहेत, आता काय मला मूल नको आणि हा त्रासही नको अशा विचाराने या महिला Hysterectomy करायला लगेच तयार होतात. Fabroids यांना गाठ समजण्याची, त्याला कॅन्सर समजण्याची आणि आता आपण मरणार अशी भीती बाळगण्याची एक सवय तिथे दिसून आली. लोक हा निर्णय घेताना कुठलाही medical base लक्षात न घेता पुढे जातात. ग्रामीण भागातील सरकारी आरोग्य व्यवस्थेची दुरावस्था झालेली आहे, त्यामुळे महिलांच्या प्रजनन आरोग्यावरील उपचाराकरिता त्यांना जवळपास योग्य उपचार न मिळाल्यामुळे देखील Hysterectomy करून घेण्याकडे त्यांचा कल असतो. या शस्त्रक्रियेचा सामाजिकदृष्ट्या कसा परिणाम होतो या अंगाने मी जास्त पहात होते. हा अभ्यास काही ना काही प्रकारे सरकारपर्यंत पोचवण्याचे प्रयत्न करत होते. या विषयावर महाराष्ट्र सरकारने एक समिती गठित केली होती. माझ्या पीएच.डी. च्या संशोधनातील मुख्य उद्देश या समितीला सादर केले गेले आहेत.

एका महिलेशी मी बोलत असताना तिची ही शस्त्रक्रिया करून घेण्याची मानसिकता काही वेगळीच होती. तिला तीन मुली होत्या आणि जर मला उद्या काही झालं, काही कारणाने मृत्यू झाला तर माझ्या नवऱ्याशी कोणीही दुसरं लग्न करणार नाही. याची भीती बाळगून तिने ही शस्त्रक्रिया करून घेतली होती.

## निरामय आरोग्य आणि आयुर्वेद-योग यांची सांगड






ग्रामीण महिलांनी निरोगी रहावं यासाठी आपण त्यांना काय देऊ शकतो? आपल्याकडे सध्या माहितीच्या व्यतिरिक्त त्यांना ठोस असं देण्यासारखं काही उपलब्ध नाही. आपण योगासनाच्या माध्यमातून त्यांना उत्तरं देऊ शकतो असं वाटलं. प्रत्येकवेळा वैद्य किंवा तज्ज्ञ यांच्यापेक्षा जर त्यांचं आरोग्य त्यांच्या हाती देऊ शकलो तर ती मोठी मदत ठरेल. दिनचर्या, ऋतुचर्या, आयुष्य कसं असावं याबद्दल आयुर्वेदात खूप उत्तम गोष्टी सांगितल्या आहेत. तर आयुर्वेद आणि योग यातून त्यांना त्यांचं आयुष्य बदलण्यासाठी काहीतरी देता आलं पाहिजे यासाठी मी प्रयत्न करते आहे.

सध्या मी मुख्यतः Sustainable development goals या विषयावर काम करत आहे. आसाम, पंजाब व गुजराथ या राज्यांमधील निवडक संस्थांबरोबर हे काम चालतं. मुख्यतः SDGs गाठण्याच्या उद्देशाने ज्या योजना राबवल्या जात आहेत, त्यांचे Gender Equality च्या दृष्टिकोनातून विश्लेषण करणे असं हे काम आहे. SDG Gender Index असा एक इंडेक्स आहे, त्याच्या आधारावर माझे 'सहज' या बडोदास्थित संस्थेबरोबर जास्त काम चालू आहे. त्याच बरोबर मी काही संस्थांच्या Institutional Ethics Committees ची सदस्या म्हणून काम पाहात आहे.



कार्यभूषण पुरस्कार






रोटरी पुरस्कार

पीएच.डी. झाल्यानंतर गेली सहा वर्षे कन्सलटंट म्हणून काम करत आहे. साथीमध्ये काम करत असताना NGOs च्या कामाचं स्त्रीवादी दृष्टिकोनातून मूल्यमापन कसं करायचं याचं प्रशिक्षण घेण्याची संधी मिळाली. Feminist Evaluations या विषयावर European Evaluation सोसायटीच्या कॉन्फरन्समध्ये मांडणी करणाऱ्या गटात देखील सहभाग घेता आला. Common Health, प्रजनन आरोग्य या विषयावर काम करणाऱ्या coalition बरोबर भारतभरातील वेगवेगळ्या संस्थांबरोबर प्रजनन आरोग्य आणि खास करून सुरक्षित गर्भपाताच्या हक्कांबद्दल देखील सध्या माझं काम चालू आहे. हे सगळं चालू

असताना आयुर्वेदाकडे दुर्लक्ष होतय याची जरा खंत वाटत होती. त्यामुळे आयुर्वेदाप्रमाणे योग यांची सांगड घालून त्या बद्दल संशोधन करण्याचा देखील विचार आहे. योगशास्त्रातील सखोल ज्ञान घेण्याच्या विचारानी सध्या मी SUYASA येथे M.Sc. in Yoga Therepy मी करते आहे. आपल्याकडे आधुनिक तंत्रज्ञान आलं आहे पण ते वापरण्याचा विवेक जर माणसाकडे नसेल तर हे नवं तंत्रज्ञान आपला शत्रू ठरू शकतं. आणि या मनावर नियंत्रण ठेवणं हे केवळ योगानेच जमू शकतं. योग म्हणल्यावर बहुधा आसन आणि प्राणायाम यावरच भर दिला जातो. योगाचे चार प्रकार (ज्ञानयोग, भक्तियोग, कर्मयोग आणि राजयोग) आणि राजयोगाची आठ अंगे आहेत. यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधि या आठ अंगांचा मिळून राजयोग होतो. खूप advanced आसनं केली म्हणजे योग जमला असं नसतं. आपल्याला या सगळ्यातलं थोडं-थोडं आपल्या जगण्यात उतरवता आलं पाहिजे.

माझ्या आयुष्यातील गुरुतुल्य व्यक्ती असं म्हणताना अनंत फडके आणि अभय शुक्ला यांचं नाव डोळ्यासमोर येतं. NGO, त्यांची कार्यपद्धती या अगदी पहिल्या पायऱ्या मला त्यांनी शिकवल्या. डॉ. अनंत फडके एमबीबीएस डॉक्टर असून आरोग्य चळवळीत त्यांचे गेली ४० वर्षे योगदान आहे. त्यांचे शेकडो लेख प्रसिद्ध झाले आहेत. जेनेरिक मेडिसीन या विषयावर त्यांचे उल्लेखनीय काम आहे. डॉ. भय शुक्ला यांनी AIMS, New Delhi येथून डॉक्टर ही पदवी मिळविली आहे. आरोग्य हक्क, लोकाधारित आरोग्य सेवांची देखरेख, प्रायव्हेट सेक्टर रेग्युलेशन या विषयांवर त्यांचे मुख्यतः काम आहे. जन आरोग्य अभियानामध्ये वीसहून अधिक वर्षे ते सक्रीय आहेत.

साथी संस्था अतिशय लोकशाही पद्धतीने कार्यरत आहे. अगदी पंचवीस स्टाफ मेंबर्स working groups चे सदस्य निवडले जातात. अशा अनेक गोष्टी मी तिथे शिकत गेले. हे दोघही डॉक्टर असून खोऱ्याने पैसा न ओढता आज समाजातल्या तळागाळातील लोकांसाठी काम करत आहेत. सध्या रेणू खन्ना यांच्याबरोबर मी काम करते आहे. मी संपूर्ण स्त्रीवादी दृष्टीकोन त्यांच्याकडून शिकले. सत्तासंबंध पहायला शिकवणारा दृष्टीकोन म्हणून स्त्रीवाद असा मी त्यांच्याकडून पहायला शिकले. आणि त्याचा फायदा, नुकसान ओळखून त्यात समतोल कसा आणू शकतो याचा विचार करायला शिकवले. संसाधने कोणाकडे जास्त आहेत, निर्णय घ्यायचं स्वातंत्र्य कोणाकडे आहे आणि याची उत्तरं शोधता-शोधता एक निरोगी समाज आपण घडवायला हवा.

संपूर्ण प्रवास पाहताना हे सगळं incremental वाटतं. छोट्या-छोट्या गोष्टी होत जातात. काम, ज्ञान कणाकणानेच वाढत जातं त्यामुळे एक असा क्षण turning point सांगणं अवघड ठरून जातं. २०१५ साली UN कडून शाश्वत विकासाची उद्दिष्टं ठरवली गेली. २०१५ साली Financing for development या विषयावर Adis Ababa येथे झालेल्या जागतिक परिषदेला जाण्याची मला संधी मिळाली. जेव्हा या जागतिक परिषदा होतात तेव्हा त्या देशाचं सरकार हे त्यांनी आजपर्यंत या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी काय प्रयत्न केले जात आहेत असं सांगायचा प्रयत्न करतं. पण काही प्रातिनिधिक NGOs तिथे जाऊन आणखी किती काम करायला हवं आहे आणि अजून काय उणीवा आहेत हे सगळ्यांच्या निदर्शनास आणून देतं, हे काम करण्याची संधी मला सलग दोन वर्षं मिळत गेली. United Nations च्या New York येथील head quarters मध्ये बसून या जागतिक चर्चा ऐकणं आणि मांडणी समजावून घेणं याचा अनुभव मिळाला हे खूप छान वाटलं. United Nations General Assembly दरवर्षी सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात New York इथे होते. दोन वर्षं त्या UNGA week मध्ये आमच्या प्रकल्पाच्या कामाची मांडणी करण्याची संधी मला मिळाली.





**न्यूयॉर्क येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभाग**

या राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय परिषदा आणि त्यात आपल्या संशोधनाची मांडणी करणे यात जे समाधान मिळतं त्यापेक्षा कितीतरी समाधान ग्रामीण भागातील महिलांशी संवाद साधून मिळतं. त्यांना त्यांच्या शरीराविषयी आणि विशेषतः मासिक पाळीविषयीची वैज्ञानिक माहिती मिळाल्यावर या महिलांच्या डोळ्यात जी चमक दिसते, तेव्हा आपल्या कामाचा थोडाफार तरी उपयोग आहे याचं समाधान वाटतं.

माझ्या कामानिमित्त मला खूप प्रवास करावा लागतो. मात्र माझ्या कुटुंबाकडून भरभक्कम पाठिंबा आहे. त्यामुळे काम करताना अडचणी जाणवत नाहीत. माझं लग्न ठरलं तेव्हा मी कुटुंबातील सगळ्यांना या कामाची स्पष्ट कल्पना दिली होती. आणि सगळ्यांना ते मान्य होतं. आजपर्यंत मला कुठेही जायला, काम करायला सगळ्यांचा पाठिंबा मिळत गेला. घरामधल्या कामाचं वाटप झालेलं असतं. घरातल्या कामाला येणाऱ्या मावश्या यांचाही खूप मोलाचा वाटा त्यामध्ये असतो. माझ्या मुलीचं सामाजिक पालकत्व झालं. माझी बहिण, आमचे नातेवाईक सगळे मिळून मदत करतात. त्यामुळे हा प्रवास निश्चितच सोपा झाला. पण या सगळ्यात एक गोष्ट नक्की सांगायला आवडेल ती म्हणजे स्वतःचं प्राधान्य ठरवता यायला हवं. जेव्हा माझं पोस्ट ग्रॅज्युएशन चालू होतं तेव्हा लग्न करायचं नाही असं मी ठरवलं होतं, मग भलेही लग्नाचं वय उलटून चाललय याचा ताण घेतला नाही. जेव्हा माझी मुलगी लहान होती तेव्हा मला संपूर्ण कल्पना होती की तिला आत्ता माझी सगळ्यात जास्त गरज आहे त्यावेळी मी एक वर्ष काम थांबवल होतं. कुठल्या वेळी काय करायचं याचा प्राधान्यक्रम जर ठरलेला असेल तर करियर आणि संसार यात फार गुंतागुंत होत नाही.

आत्तापर्यंच जे-जे आवडेल ते करत गेले. विविध प्रकल्पांच्या निमित्ताने जे-जे शिकण्याची संधी मिळाली ती घेत गेले आणि त्यातून खूप विविध प्रकारच्या अनुभवांची शिदोरी मिळाली. मी आयुष्यात फार पुढचं प्लॅनिंग कधी केलं नाही. खूप नियोजनबद्ध असे निर्णय घेतले नाहीत त्यामुळे येत्या दहा वर्षांत मी कुठे असेन असं सांगता येणं अवघड आहे. पण स्त्री आरोग्य, योग या विषयात ते काम असेल असं वाटतं. असे काम करणाऱ्या काही संस्थांना मदत करायला आवडेल.





**कुटुंबाचा भक्कम आधार**

**स्त्रीविकास हाच माझा पक्ष !**

खरंतर प्रबोधिनीतलं काय बदलाव असं वाटतय, या प्रश्नाचं माझं उत्तर 'काही नाही' असंच असेल. मात्र अगदीच सांगायचं झालं तर प्रबोधिनीचा हिंदुत्ववादी असा जो चेहरा झालेला आहे तो कसा बदलता येईल असा विचार झाला पाहिजे. शाळेत असताना आम्ही सगळ्या धर्मांचा अभ्यास करायचो, सगळ्या धर्मांच्या प्रार्थना म्हणायचो. मला कधी हा हिंदुत्ववादी चेहरा जाणवला नाही. मी जेव्हा साथी संस्थेत मुलाखत दिली तेव्हा त्यांना मी प्रबोधिनीची आहे या वरून मी उजव्या विचारसरणीची असेन असे वाटले होते. तुम्ही कुठल्या विचारसरणीचे आहात ही गोष्ट तुमच्या कामापुढे दुय्यम असते, म्हणून मी सगळया विचारसरणीच्या लोकांबरोबर काम करू शकते. मला फक्त स्त्रीविकासासाठी काम करायचं आहे एवढंच लक्षात घ्या. हे पाहिल्यावर मला त्यांनी काम करायची संधी दिली.

प्रबोधिनी आता कालसंगत होते आहे. मी SPG Public Health साठी तासिका घ्यायला शाळेत येते. अनघाताई लवळेकर यांच्याबरोबर काही काम करत होते. वेल्ह्यात योगसखीच्या निमित्ताने सुवर्णाताई यांच्याबरोबर काही काम झालं.

पुढच्या विद्यार्थ्यांना सांगण्यासाठी मी अजून विद्यार्थीदशेतून बाहेर आलेले नाही. पण मला वाटतं की ज्या–ज्या वेळी आपण जे–जे करत असतो तिथे आपण आपलं १००% लक्ष द्यायला हवं त्याशिवाय आपल्याला स्वतःला त्याचा आनंद मिळू शकत नाही. दुसरी गोष्ट म्हणजे प्राधान्य ठरवता यायला हवं. बऱ्याच लोकांच्या आयुष्यात जे गोंधळ होतात ते हे प्राधान्यक्रम चुकल्यामुळे होतात. तिसरं म्हणजे मला एखाद्या कामातून किती पैसा मिळणार आहे याचा विचार काम करताना कधीही केला नाही. आपलं काम जर चोख असेल तर जगण्यासाठी पुरेसा पैसा हा आपल्याला मिळतच जातो. पैसा मिळेल की नाही हे ठरवून काम निवडू नका, आपण कमी पैशात भागवू शकतो. आणखी एक म्हणजे dont put all your eggs in one basket. कामाबरोबरच माझे मित्र–मैत्रिणी, कुटुंब या सगळ्यांना माझ्या आयुष्यात मोठं स्थान आहे. मला ट्रेकिंग आवडतं, ते मी चाळिशी नंतर सुरू केलं. अशा अनेक गोष्टी करत राहीलं पाहिजे. प्रबोधिनीशी जोडलेले रहा, खारीचा का होईना वाटा उचलत रहा, आणि पुढची प्रबोधकांची पिढी घडवत राहा.



**SPG गटाची बीजे मेडिकल कॉलेजला भेट**





**ज्ञान प्रबोधिनी निगडी व पुणे येथील गणेशोत्सव**



**रूपीन पास ट्रेक**



**सातारा हिल हाफ मॅरॅथॉन**

## RAPID FIRE

१. आवडता चित्रपट - दिल तो पागल है

२. आवडतं पुस्तक - An autobiography of a yogi

३. छंद- धावणं, treking

४. प्रबोधिनीत लक्षात राहिलेले अध्यापक - राजीव रानडे, रसायनशास्त्र

५. लक्षात राहिलेला प्रबोधिनीचा उपक्रम - बिहार मदतकार्य

**पहिली प्रतिक्रिया**

१. सेहत संस्था- accountability

२. स्त्रीशिक्षण- प्रगतीपथावर आहोत...

३. ज्ञान प्रबोधिनी - व्यक्तिमत्त्व घडवण्यात खूप मोठा वाटा, प्रत्येकाने काही काळ तरी किमान इथे घालवावा.

**नीलांगी नानल–सरदेशपांडे**
**9881144564**
**nilangisar@gmail.com**

**मुलाखत व शब्दांकन – चिन्मयी खरे**

**संपादन – मानसी बोडस, पल्लवी गोखले – नगरकर**

**आरेखन व मांडणी – निशिगंधा खळदकर**

Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org